# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** शासन निर्णय क्र. एमव्हीआर-०५२२/प्र.क्र.४१/भाग-१/परि-२, दि. २७
**{अग्निशमन विभाग}** जानेवारी २०२३ अन्वये मोटर वाहन निष्कासन संपन्न राज्यात राबविण्यात येत आहे. त्यानुसार राज्यातील शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था यांचे अधिनस्त असलेले १५ वर्ष किंवा १५ वर्षापेक्षा जास्त वय असणारी वाहने निष्कासित करणे अनिवार्य आहे. यानुसार १५ वर्षापेक्षा अधिक वय असलेली ९ फायर टेंडर प्रादेशिक परिवहन विभागातर्फे निर्लेखित करण्यात आले आहे.

अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाचे सध्या ९ अग्निशमन केंद्र कार्यरत आहे. तसेच पाचपावली, वाठोडा व पुनापूर अग्निशमन केंद्राचे बांधकाम कार्य सुरु असून ऑगस्ट २०२४ अखेरपर्यंत बांधकाम कार्य पुर्ण होवून कार्यान्वीत होण्याची शक्यता आहे. सदर केंद्रे अग्शिमन सेवेत कार्यान्वीत झाल्यावर १२ अग्निशमन केंद्राद्वारे शहर व शहरहद्दीबाहेरील नागरीकांना अग्निशमन सेवा उपलब्ध होणार आहे. याकरीता विभागाकडे कमीत कमी १४ अतिरिक्त वेगवेगळया क्षमतेचे फायर टेंडर असणे आवश्यक आहे.

याकरीता ५ नग १६००० लि. क्षमतेचे वॉटर बाऊजर करीता प्राकलन राशी रु. ७,०८,००,०००/- ; ३ नग ५००० लि. क्षमतेचे वॉटर फायर टेंडर करीता प्राकलन राशी रु. ३,६१,०८,०००/- ; ६ नग २००० लि. क्षमतेचे मिनी वॉटर फायर टेंडर करीता प्राकलन राशी रु. ६,२९,४१,२००/- असे एकूण १४ फायर टेंडर चेसीससह फेब्रिकेशन कार्य करुन घेण्याच्या प्राकलन राशी रु. १६,९८,४९,२००/- (सर्व करासहित) फेब्रिकेशन कार्याची स्वतंत्र निविदा मागवून कार्य करुन घेण्याच्या विषय विचारात घेणे.

टीप :- सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 877/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 26/06/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार शासन निर्णय क्र. एमव्हीआर-०५२२/प्र.क्र.४१/भाग-१/परि-२, दि. २७ जानेवारी २०२३ अन्वये मोटर वाहन निष्कासन संपन्न राज्यात राबविण्यात येत आहे. त्यानुसार राज्यातील शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था यांचे अधिनस्त असलेले १५ वर्ष किंवा १५ वर्षापेक्षा जास्त वय असणारी वाहने निष्कासित करणे अनिवार्य आहे. यानुसार १५ वर्षापेक्षा अधिक वय असलेली ९ फायर टेंडर प्रादेशिक परिवहन विभागातर्फे निर्लेखित करण्यात आले आहे.

अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाचे सध्या ९ अग्निशमन केंद्र कार्यरत आहे. तसेच पाचपावली, वाठोडा व पुनापूर अग्निशमन केंद्राचे बांधकाम कार्य सुरु असून ऑगस्ट २०२४ अखेरपर्यंत बांधकाम कार्य पुर्ण होवून कार्यान्वीत होण्याची शक्यता आहे. सदर केंद्रे अग्शिमन सेवेत कार्यान्वीत झाल्यावर

१२ अग्निशमन केंद्राद्वारे शहर व शहरहद्दीबाहेरील नागरीकांना अग्निशमन सेवा उपलब्ध होणार आहे. याकरीता विभागाकडे कमीत कमी १४ अतिरिक्त वेगवेगळया क्षमतेचे फायर टेंडर असणे आवश्यक आहे.

याकरीता ५ नग १६००० लि. क्षमतेचे वॉटर बाऊजर करीता प्राकलन राशी रु. ७,०८,००,०००/- ; ३ नग ५००० लि. क्षमतेचे वॉटर फायर टेंडर करीता प्राकलन राशी रु. ३,६१,०८,०००/- ; ६ नग २००० लि. क्षमतेचे मिनी वॉटर फायर टेंडर करीता प्राकलन राशी रु. ६,२९,४१,२००/- असे एकूण १४ फायर टेंडर चेसीससह फेब्रिकेशन कार्य करुन घेण्याच्या प्राकलन राशी रु. १६,९८,४९,२००/- (सर्व करासहित) फेब्रिकेशन कार्याची स्वतंत्र निविदा मागवून कार्य करुन घेण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.